मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये 15 ऑगस्टपासून कचऱ्यासंबंधी नवीन नियम!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी कचरा वर्गीकरण सक्तीचे केले आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियमांची १५ ऑगस्ट २०२६ पासून कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार, घरगुती तसेच व्यावसायिक आस्थापनांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य अशा चार प्रकारांत विलगीकरण करणे अनिवार्य राहणार आहे. विलगीकरण न केलेला कचरा १५ ऑगस्टपासून महापालिकेच्या घंटागाड्यांमार्फत स्वीकारला जाणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असून, नागरिकांसह मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या सर्व आस्थापनांसाठीही हे नियम बंधनकारक असतील. घनकचरा व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून विकेंद्रित कचरा व्यवस्थापन प्रणालीला प्राधान्य देण्यात येत आहे. शहरातील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे कचऱ्याची वाहतूक कमी होऊन स्थानिक पातळीवरच कचऱ्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करणे शक्य होणार आहे.

मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांसाठी आता स्वतंत्र जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. १५ ऑगस्टनंतर अशा आस्थापनांचा कचरा महापालिकेच्या घंटागाड्यांमार्फत उचलला जाणार नाही. संबंधित आस्थापनांनी त्यांच्या परिसरातच निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे बंधनकारक राहणार आहे. महापालिकेने नागरिकांना घरगुती कचरा चार प्रकारांत वर्गीकृत करूनच घंटागाडीकडे सुपूर्द करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, गृहनिर्माण संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, व्यावसायिक आस्थापना आणि इतर मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांनीही कचऱ्याचे योग्य विलगीकरण करणे आवश्यक राहणार आहे.

कचऱ्याचे योग्य वर्गीकरण झाल्यास त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करणे, पुनर्वापराला चालना देणे आणि लँडफिलवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करणे शक्य होणार आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या दिशेने महापालिकेचा हा महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे.

महापौर रवी लांडगे म्हणाले, "स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी पिंपरी चिंचवड शहर घडविण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. कचरा विलगीकरण हा केवळ नियम नसून, आपल्या शहराच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली जबाबदारी आहे. महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे. नागरिकांच्या हितासाठी आणि शहराच्या स्वच्छतेसाठी राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदवून कचरा विलगीकरणाची सवय अंगीकारावी.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, "स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी कचरा विलगीकरण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय अंगीकारल्याशिवाय प्रभावी घनकचरा व्यवस्थापन शक्य होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार नियमांची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार असून, नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा."

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, "शहरातील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कचरा प्रक्रिया केंद्रे उभारून विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाला गती दिली जात आहे. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी त्यांच्या परिसरातच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. यामुळे कचऱ्याची वाहतूक कमी होऊन प्रक्रिया अधिक प्रभावी पद्धतीने करता येईल. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल."

# सायबर फसवणुकीला लगाम! 5 लाखांवरील गुन्ह्यांना आता थेट ऑटो एफआयआर; तपासाला मिळणार वेग

## पिंपरी-चिंचवडमध्ये सहा महिन्यांत 283 मोठ्या सायबर फसवणुकीच्या तक्रारी; 1930 हेल्पलाइनवर तातडीने संपर्काचे आवाहन




**पुणे | प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र, राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल आणि सीसीटीएनएस यांची परस्पर जोडणी अधिक सक्षम करण्यात आली आहे. पाच लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये आता थेट 'ऑटो एफआयआर' दाखल होणार आहे. त्यामुळे गुन्हा नोंदविण्यात होणारा विलंब टळून तपासाला तातडीने सुरुवात होणार आहे.

नवीन प्रणालीत पीडिताने '१९३०' हेल्पलाइन किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवताच ती डिजिटल पद्धतीने नोंदविली जाईल. पात्र प्रकरणांमध्ये प्रणालीद्वारे आपोआप 'ई-झिरो एफआयआर' तयार होऊन संबंधित पोलिस ठाण्याकडे तपासासाठी वर्ग केला जाईल. त्यामुळे संशयित बँक व्यवहार तातडीने रोखणे, डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवणे आणि तपास वेगाने सुरू करणे शक्य होणार आहे.

यापूर्वी तक्रार आणि एफआयआर नोंदविण्यात होणाऱ्या विलंबाचा फायदा सायबर गुन्हेगार घेत होते. तोपर्यंत फसवणुकीची रक्कम विविध खात्यांमध्ये वळविली जात असल्याने पैसे परत मिळविणे कठीण जात होते. नव्या प्रणालीमुळे अशा पात्र तक्रारींचे थेट एफआयआरमध्ये रूपांतर होणार असल्याने तपास अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या सहा महिन्यांत पाच लाख रुपयांपेक्षा जास्त फसवणुकीच्या २८३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नव्या प्रणालीमुळे या पात्र तक्रारींचे थेट 'ई-झिरो एफआयआर' मध्ये रूपांतर होणार आहे. शहरात वर्षाला सरासरी साडेसात हजार पारंपरिक गुन्हे, तर सायबर विभागाकडे १७ हजारांहून अधिक तक्रारी येतात. ऑनलाइन गुंतवणूक, डिजिटल अटक, यूपीआय फ्रॉड आणि केवायसी अपडेटच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

# पुणे-नाशिक महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादनाला गती द्या..!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना; राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महापालिका अधिकाऱ्यांची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरण आणि प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. प्रकल्पासाठी आवश्यक असलेले भूसंपादन तातडीने पूर्ण करून कामाला गती देण्याच्या सूचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे-नाशिक महामार्गाचे रुंदीकरण आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतुकीचा वेग वाढण्यासह औद्योगिक आणि आर्थिक विकासालाही चालना मिळणार आहे.



### प्रकल्पाची तांत्रिक वैशिष्ट्ये...

» नाशिक फाटा ते खेड (राजगुरूनगर) दरम्यान राष्ट्रीय महामार्ग-६० वर सुमारे ३० किलोमीटर लांबीचा आठ पदरी (8-Lane) एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रस्तावित आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ७ हजार ८२७ कोटी रुपये असून, तो 'बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर' (BOT) तत्त्वावर विकसित करण्यात येणार आहे. एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे भोसरी, मोशी, चाकण आणि औद्योगिक पट्ट्यातील वाहतुकीला अखंड आणि वेगवान मार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच, विद्यमान महामार्गाचे चार ते सहा पदरी रुंदीकरण, दोन्ही बाजूंना सेवा रस्ते (Service Roads) आणि वाहतूक सुरक्षिततेसाठी आवश्यक सुविधा उभारण्यात येणार आहेत.

बैठकीत प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. तसेच, भूसंपादन प्रक्रियेमधील अडचणी, संबंधित विभागांमधील समन्वय आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. प्रकल्पाची मुदत लक्षात घेऊन सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय साधून काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीला महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगर रचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे, सहायक संचालक संदेश खडतरे, कनिष्ठ अभियंता संतोष जगदाळे, NHAI चे प्रोजेक्ट डायरेक्टर गौतम, सर्व्हेअर प्रशांत माळी तसेच विशेष भूसंपादन अधिकारी उषा विश्वासराव आणि हर्षद घुले उपस्थित होते.

यावेळी आमदार महेश लांडगे यांनी, "पुणे-नाशिक महामार्ग आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर हा भोसरी मतदारसंघासह संपूर्ण पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. भूसंपादन प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब होणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत सर्व प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेत पूर्ण कराव्यात," असे निर्देश दिले.

दरम्यान, आगामी काळात या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीवर मोठ्या प्रमाणात उपाय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, प्रशासनानेही प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी हालचालींना वेग दिला आहे.

> **"पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरण आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ पायाभूत सुविधा प्रकल्प नसून, पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील विकासाचा महामार्ग आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत आवश्यक आहे. भूसंपादन प्रक्रियेमुळे कामात कोणताही विलंब होऊ नये, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. नागरिकांच्या हिताचे संरक्षण करत पारदर्शक आणि वेळबद्ध पद्धतीने सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. या प्रकल्पामुळे भोसरीसह संपूर्ण पिंपरी-चिंचवडच्या वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा मिळेल आणि उद्योग, व्यापार तसेच रोजगाराच्या संधींनाही मोठी चालना मिळेल."**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे..**

# मोशीतील वायू प्रदूषणाविरोधात प्रा. कविता आल्हाट यांचा आक्रमक पवित्रा..!

## नागरिकांच्या तक्रारीची आयुक्तांकडून दखल; अनधिकृत भंगार साठ्यांवर कारवाईचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी परिसरातील विष्णू ग्रीन्स सहकारी गृहरचना संस्थेजवळ वारंवार प्लास्टिक, टायर व इतर भंगाराला आग लावून निर्माण होणाऱ्या तीव्र वायू प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर महिला अध्यक्षा प्रा. कविता संदेश आल्हाट यांनी नागरिकांच्या बाजूने ठाम भूमिका घेत महापालिका प्रशासनाकडे आक्रमक पाठपुरावा केला.



विष्णू ग्रीन्स सहकारी गृहरचना संस्थेतील महिलांनी प्रा. कविता संदेश आल्हाट यांची भेट घेऊन परिसरातील प्रदूषणाबाबत निवेदन सादर केले. त्यानंतर त्यांनी तातडीने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रत्यक्ष भेट घेत नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले. तसेच महापौर रवी लांडगे यांचीही भेट घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई, अनधिकृत भंगार साठे हटविणे आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. या वेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे उपस्थित होते.

प्रा. कविता संदेश आल्हाट यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तात्काळ संयुक्त पाहणी करण्याचे, अनधिकृत भंगार साठे हटविण्याचे, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

याबाबत प्रतिक्रिया देताना प्रा. कविता संदेश आल्हाट म्हणाल्या, "नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. मोशी परिसरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त वातावरण मिळावे, यासाठी माझा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील. प्रशासनाने दिलेल्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होईपर्यंत मी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करणार आहे."

# आठ वर्षे काम सुरु असलेल्या समान पाणीपुरवठा योजनेची श्वेतपत्रिका काढा!

**पुणे शहरात गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेल्या 24 तास समान पाणीपुरवठा योजनेवर तब्बल 1600 कोटी रुपये खर्च होऊनही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

समान आणि पुरेसे पाणी मिळण्यासाठी महापालिकेने सुरू केलेल्या समान पाणीपुरवठा योजनेवर आतापर्यंत १६०० कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. आठ वर्षापासून या योजनेचे काम सुरू असून एवढा खर्च केल्यानंतरही समान पाणी कधी मिळेल, याची शाश्वती नाही. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणी बाबत शंका उपस्थित केली जात आहे.

शहरातील सर्व भागांतील नागरिकांना समान आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने २०१८ मध्ये समान पाणी पुरवठा योजना राबविण्यास सुरुवात केली. यासाठी नवीन जलवाहिन्या टाकणे, पाण्याच्या टाक्या उभारणे आणि नागरिकांच्या नळजोडण्यांना पाणीमीटर बसविण्याचे नियोजन करण्यात आले होते. या प्रकल्पाचे काम मूळ नियोजनानुसार मार्च २०२२ पर्यंत पूर्ण होणे गरजेचे होते. मात्र, जलवाहिन्या आणि पाणीमीटर बसविण्याच्या कामाचा मूळ आवाका सुमारे २५ टक्क्यांनी कमी करण्यात आला. त्यानंतरदेखील या प्रकल्पाला वारंवार मुदतवाढ देण्यात आली.



## १६०० कोटींचा खर्च, तरीही प्रतीक्षा कायम

» महापालिकेने २०१८ मध्ये समान पाणीपुरवठा योजना सुरू केली. या योजनेचा उद्देश शहरातील प्रत्येक भागाला समान आणि पुरेसा पाणीपुरवठा करणे हा होता. गेल्या आठ वर्षांत जलवाहिन्या, पाण्याच्या टाक्या आणि पाणीमीटर बसविण्यावर आतापर्यंत सुमारे १६०० कोटी रुपये खर्च झाले आहेत. तरीही योजना पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. सुरुवातीला मार्च २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते; मात्र वारंवार मुदतवाढ देण्यात आली. सध्या ९० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला असून उर्वरित कामासाठी आणखी नऊ ते दहा महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे सांगितले आहे.

तीन दिवसांपूर्वी गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याची भूमिका मांडली. पुणे महापालिकेची समान पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात आले असून, ऑक्टोबरपर्यंत ही योजना कार्यान्वित करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीरपणे सांगितले.

गेल्या आठ वर्षांत या योजनेचे काम ९० टक्के काम पूर्ण झाले असून, आतापर्यंत या योजनेवर महापालिकेने १६०० कोटी रुपये खर्च केले आहेत. हे काम पूर्ण होण्यास नऊ ते दहा महिने लागतील, असा दावा प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. या योजनेला लागलेला वेळ आणि त्यावर झालेला खर्च लक्षात घेता त्याची श्वेतपत्रिका काढून पुणेकरांसमोर ठेवावी, अशी मागणी सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केली.

## मुख्यमंत्री फडणवीसांचे ऑक्टोबरचे लक्ष्य

» गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन पाण्याचे दीर्घकालीन नियोजन करण्याची गरज व्यक्त केली. समान पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात असून ऑक्टोबरपर्यंत ही योजना कार्यान्वित करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना दिल्याचे त्यांनी जाहीर केले. योजना सुरू झाल्यानंतर अनेक वेळा मुदतवाढ मिळाल्याने नागरिकांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी जाहीर केलेली मुदत पाळली जाते का, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

## श्वेतपत्रिकेची मागणी

» सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी समान पाणीपुरवठा योजनेबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे. आठ वर्षांत १६०० कोटी रुपये खर्च होऊनही नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळालेली नाही, असा त्यांचा आरोप आहे. २४ तास पाणीपुरवठ्याचे आश्वासन देण्यात आले असताना आज शहरात अनेक भागांत एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. योजनेच्या विलंबामागील कारणे, खर्चाचा तपशील आणि प्रत्यक्ष प्रगती नागरिकांसमोर पारदर्शकपणे मांडावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरु होण्याआधीच तिकीटाची घाई!

**पुण्यात हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो (Line 3) सुरु होण्यास विलंब होत असला तरी पुणेरी मेट्रोने प्रवाशांच्या सोयीसाठी अत्याधुनिक स्मार्ट तिकीट यंत्रणा सज्ज केली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू होण्याची प्रतिक्षा पुणेकरांना आहे. मेट्रो सुरू होण्याचा मुहुर्त सातत्याने पुढे ढकलण्यात येत आहे. मात्र, पुणेरी मेट्रोने सेवा सुरू करण्यापूर्वीच प्रवाशांसाठी स्मार्ट तिकीटाची व्यवस्था उपलब्ध करून देण्याची घाई केली आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रोच्या तिसऱ्या मार्गिकेवर टप्प्याटप्प्यात सुरू होणाऱ्या १२ स्थानकांवर ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन (एएफसी) प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रत्येक स्थानकावर दोन प्रवेशद्वार, दोन निर्गमनद्वार आणि दिव्यांगांसाठी स्वतंत्र असे पाच एएफसी प्रवेशद्वार असणार आहेत. गर्दीच्या वेळी प्रवाशांची वर्दळ सुरळीत ठेवण्यासाठी स्मार्ट क्यू व्यवस्थापनाची सुविधाही या प्रणालीत समाविष्ट करण्यात आली आहे. उर्वरित स्थानकांवरही ही प्रणाली बसविण्याचे काम सुरू असल्याची माहिती पुणेरी मेट्रोकडून देण्यात आली.



पुणेरी मेट्रोकडून प्रवाशांसाठी अत्याधुनिक स्मार्ट तिकीट व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी), व्हॉट्सअॅप क्युआर तिकीट, मोबाईल अॅप, तिकीट व्हेंडिंग मशीन (टिव्हीएम) आणि तिकीट काउंटर अशा सुविधांद्वारे प्रवाशांना अवघ्या काही क्षणांत मेट्रोचे तिकीट घेता येणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक जलद, सुलभ आणि पूर्णपणे डिजिटल होणार असल्याचे मेट्रो प्रशासनाकडून कळविण्यात आले.

केंद्र सरकारच्या वन नेशन, वन कार्ड उपक्रमांतर्गत हिंजवडी-शिवाजीनगर या मेट्रोच्या तिसऱ्या मार्गिकेवर प्रवासी वाहतुकीच्या पहिल्या दिवसापासूनच एनसीएमसी कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्डद्वारे पुणे मेट्रोच्या लाईन १, लाईन २ आणि देशातील इतर मेट्रो सेवांचाही वापर करता येणार आहे. त्यामुळे वेगवेगळ्या शहरांसाठी स्वतंत्र कार्ड बाळगण्याची गरज राहणार नाही.

## पुणे मेट्रोसाठी एकच तिकीट कधीपासून?

» सध्या मेट्रो लाइन १ आणि लाइन २ साठी तिकिटाची सुविधा उपलब्ध असलेल्या पुणे मेट्रो या मोबाईल अॅपवरही मेट्रो लाइन ३ वरील तिकीट आरक्षित करता येणार आहे. सुरूवातीला मेट्रोच्या अॅपमध्ये लाइन ३ च्या तिकीटासाठी स्वतंत्र पर्याय उपलब्ध असेल. मात्र, जिल्हा न्यायालय स्थानकावर तिन्ही मार्गांचे एकत्रीकरण पूर्ण झाल्यानंतर एकाच अॅपद्वारे संपूर्ण पुणे मेट्रोसाठी तिकीट आरक्षण करता येईल, अशी ग्वाही पुणेरी मेट्रोकडून देण्यात आली आहे.

# कचरा प्रक्रिया निविदेवर काँग्रेसचा आक्षेप; 567 कोटींच्या अतिरिक्त खर्चाचा दावा

## ओला-सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र निविदांची मागणी; संमिश्र कचरा प्रक्रियेमुळे महापालिकेच्या तिजोरीवर आर्थिक भार पडणार

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या संमिश्र कचराप्रक्रिया निविदेवर काँग्रेसने गंभीर आक्षेप घेत प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला आहे. या निविदेमुळे महापालिकेवर तब्बल ५६७ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याचा दावा पक्षाने केला आहे. ओला आणि सुका कचरा प्रक्रिया वेगवेगळी असल्याने स्वतंत्र निविदा काढाव्यात, असा दक्षता विभागाचा लेखी अभिप्राय असतानाही प्रशासनाने तो डावलल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी या बाबत स्थायी समितीला प्रस्थाव दिला असून, गटनेते चंदूशेठ कदम यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, देशभरात संमिश्र कचरा प्रक्रिया करणाऱ्या मोजक्या चार कंपन्या असून, त्यांनी परस्पर संगनमत करून विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निविदा वाटून घेतल्याचे चित्र दिसून येते. नागपूर, ग्रेटर नोएडा आणि लखनौ येथेही अशाच प्रकारच्या निविदांमध्ये भूमिग्रीन कंपनीलाच काम मिळाल्याचा दावा पक्षाने केला आहे. त्यामुळे महापालिकेच्या निविदेतील अटी-शर्तीही या कंपनीला अनुकूल ठरतील, असा इशारा यापूर्वीच प्रशासनाला दिला होता.

स्वतंत्र ओला आणि सुका कचरा प्रक्रिया निविदांद्वारे हे काम सुमारे ४०० कोटी रुपयांत होऊ शकले असते. मात्र, संमिश्र कचरा प्रक्रिया पद्धतीचा आग्रह धरल्याने भूमिग्रीन कंपनीची ९६७ कोटी रुपयांची निविदा अंतिम ठरली. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीवर सुमारे ५६७ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार असल्याचा दावा केला आहे.



### नव्या निविदेची मागणी

» काँग्रेसने सुधारित निविदा नियमावलीचा दाखला देत प्रशासनाने संमिश्र निविदा रद्द करून ओला आणि सुका कचरा प्रक्रियेसाठी स्वतंत्र निविदा मागवाव्यात, अशी मागणी केली आहे. स्वतंत्र निविदांमुळे सुमारे ४०० कोटी रुपयांत हे काम पूर्ण होऊ शकले असते, असा पक्षाचा दावा आहे. मात्र, ९६७ कोटी रुपयांची निविदा अंतिम झाल्याने महापालिकेच्या तिजोरीवर मोठा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याचा आरोप करण्यात आला असून, या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### संमिश्र निविदेवर काँग्रेसचा आक्षेप

» महापालिकेच्या संमिश्र कचरा प्रक्रिया निविदेविरोधात काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. ओला आणि सुका कचरा प्रक्रियेसाठी स्वतंत्र निविदा काढण्याचा दक्षता विभागाचा लेखी अभिप्राय असतानाही प्रशासनाने तो दुर्लक्षित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निविदेमुळे महापालिकेवर सुमारे ५६७ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. नगरसेवक अरविंद शिंदे यांनी स्थायी समितीकडे यासंदर्भात प्रस्ताव सादर केला असून, गटनेते चंदूशेठ कदम यांनी त्याला अनुमोदन दिले आहे.

### भूमिग्रीन कंपनीवर संशय

» देशभरात संमिश्र कचरा प्रक्रिया करणाऱ्या मोजक्या कंपन्यांमध्ये भूमिग्रीनचा समावेश असून, नागपूर, ग्रेटर नोएडा आणि लखनौसह विविध शहरांमध्ये याच कंपनीला काम मिळाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. निविदेतील अटी-शर्ती विशिष्ट कंपनीला लाभदायक ठरतील, असा इशारा प्रशासनाला यापूर्वीच देण्यात आला होता. स्वतंत्र निविदा काढल्यास अधिक स्पर्धा निर्माण होऊन खर्च कमी झाला असता, मात्र संमिश्र निविदेमुळे स्पर्धा मर्यादित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# पुण्यात 'ग्रीन हायड्रोजन सेंटर ऑफ एक्सलन्स'ची तयारी; एनसीएलकडून हायड्रोजन बसचे सादरीकरण

## हरित हायड्रोजन परिसंस्था विकासासाठी भागधारकांची बैठक; 9 मीटर लांबीच्या हायड्रोजन बससह 'हायड्रोजन व्हॅली' उपक्रमांवर चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एनसीएल) च्या वतीने 'ग्रीन हायड्रोजन इकोसिस्टम डेव्हलपमेंट' (हरित हायड्रोजन परिसंस्था विकास) क्षेत्रातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्याची तयारी सुरू आहे. संस्थेच्या वतीने या विषयावरील भागधारकांच्या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी ९-मीटर लांबीच्या, ग्रीन हायड्रोजनवर चालणाऱ्या बसचे सादरीकरण करण्यात आले. बसमध्ये तीन हायड्रोजन सिलिंडर्स बसवले होते

महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (मेडा) आणि राज्य सरकार यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात देशभरातील धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील नेते, संशोधक, तंत्रज्ञान विकासक, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ आणि हायड्रोजन परिसंस्थेशी संबंधित विविध घटकांनी सहभाग घेतला.




### हायड्रोजन व्हॅलीच्या अनुभवांचे कथन

यावेळी भारतातील चारही 'हायड्रोजन व्हॅली' उपक्रमांमधील अनुभव मांडण्यात आले आणि पुणे, कोची, ओडिशा व जोधपूर येथील हायड्रोजन व्हॅलीच्या प्रतिनिधींनी सादरीकरणे केली.

परिसंवादात रासायनिक उद्योग, डेटा सेंटर्स आणि दुग्ध व्यवसाय या क्षेत्रांमधील 'ग्रीन हायड्रोजन'च्या (हरित हायड्रोजनच्या) उदयोन्मुख उपयोगांचा आढावा घेण्यात आला.

शहरातील नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एनसीएल) च्या वतीने 'ग्रीन हायड्रोजन इकोसिस्टम डेव्हलपमेंट' (हरित हायड्रोजन परिसंस्था विकास) क्षेत्रातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्याची तयारी सुरू आहे. संस्थेच्या वतीने या विषयावरील भागधारकांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

> जागतिक हायड्रोजन क्षेत्रात भारताचे स्थान मजबूत आहे. उद्योगांना केवळ स्वतंत्र तंत्रज्ञान विकासापुरते मर्यादित न राहता, मूल्य साखळीतील धोरणात्मक भागीदारीद्वारे सर्वसमावेशक उपाययोजनांकडे वळले पाहिजे.
>
> \- डॉ. प्रसाद चाफेकर, संचालक, नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय

> हवामानबदल, पर्यावरणाचा ऱ्हास आणि ऊर्जेबाबतची असुरक्षितता यांचा आर्थिक भार अखेरीस समाजालाच सोसावा लागतो. त्यांनी या व्यापक संदर्भात 'ग्रीन हायड्रोजन'चे मूल्यमापन करणे गरजेचे आहे.
>
> \- डॉ. आशिष लेले, संचालक, एनसीएल